20730

तात्काळ/महत्वाचे
कालमर्यादा

जा.क.शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांकः- 30 SEP 2016

प्रति
अध्यक्ष/सचिव,
कै. उध्दवराव तुळशीराम जाधवर फौंडेशन वडगांव बु पुणे

**विषय -** सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत....

**संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.**
**२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.**
**३. शासन निर्णय एसएफएस-२०१६/प्र.क्र.९९/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३२ दि. ०९.०८.२०१६.**

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अं.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १६७ | पुणे | कै. उध्दवराव तुळशीराम जाधवर फौंडेशन वडगांव बु पुणे | डॉ सुधाकरराव जाधवर प्राथमिक ते उच्च माध्यमिक विद्यालय, धनकवडी, पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (राज्यमंडळ) | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ वी ते १२ वी सर्व शाखा) | २०१६-१७ |

अटी व शर्ती :-

१. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/ तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.
२. पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.
३. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासुन एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे अर्ज करावेत
४. ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासना निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल
५. सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडाळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पुर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C ) प्रमाणपत्र देईल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
७. संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.
८. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रदद समजण्यात येईल.
९. यु-डायस डाटा- या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळाबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,**
**१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.**
**प्रत माहितीसाठी सविनय सादर**
**१. मा. रा.ग.गुंजाळ, उप सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२**
**२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.**

**शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे**
**१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे – १.**
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२२६९६ फॅक्स क्र. ०२०-२६१२२२१७
संकेत स्थळ : dydepune.com ई-मेल : dydpune@gmil.com

---

जा.क्र. शिऊसं/माध्य-३०२/ शाळा नांव बदल/२०१८/3068
दिनांक : 23 MAY 2018

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे

विषय : शाळेच्या नांवात बदल करणेबाबत
प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर इंग्लिश मेडियम स्कूल व ज्यू कॉलेज,
धनकवडी, पुणे-४३.
ऐवजी
चाटे पब्लिक स्कूल अॅन्ड ज्यू.कॉलेज, धनकवडी पुणे

संदर्भ : १.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांचे पत्र क्रमांक
जा.क्र.जिप/शिक्षण/माध्य/२०१८/३०००,दिनांक २४.४.२०१८
२.मा.अवर सचिव,शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक
क्र.एसएसएन-१०९६/७०८८/माशि-१, दिनांक ३.१२.१९९८

उपरोक्त विषयाचे संदर्भात कळविण्यांत येते की, कै.उध्दवराव तुळशीराम जाधवर फौंडेशन, इंद्रप्रस्थ क्रांतीनगर, वडगाव बु, पुणे-४१ या संस्थेने या दिनांक २४.३.२०१८ च्या ठरावा नुसार प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर इंग्लिश मेडियम स्कूल व ज्यू कॉलेज, धनकवडी, पुणे-४३. ऐवजी चाटे पब्लिक स्कूल अॅन्ड ज्यू.कॉलेज, धनकवडी पुणे याप्रमाणे नावांत बदल करण्याचे ठरविले आहे.

| जुने नांव | नवीन नांव |
|---|---|
| प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर इंग्लिश मेडियम स्कूल व ज्यू कॉलेज, धनकवडी, पुणे-४३. | चाटे पब्लिक स्कूल अॅन्ड ज्यू.कॉलेज, धनकवडी पुणे |

संदर्भ क्रमांक २ चे शालेय शिक्षण विभाग,मुंबई यांच्या दिनांक ३.१२.१९९८ चे परिपत्रकानुसार विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांच्या कार्यालयाचे दप्तरी नोंद घेण्यात आलेली आहे. सदर नोंद आपल्या कार्यालयाच्या दप्तरी घेण्यांत यावी.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत : माहितीस्तव कार्यवाहीसाठी रवाना
अध्यक्ष, , कै.उध्दवराव तुळशीराम जाधवर फौंडेशन, इंद्रप्रस्थ क्रांतीनगर, वडगाव बु, पुणे-४१ या संस्थेने या दिनांक २४.३.२०१८ च्या ठरावा नुसार प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर इंग्लिश मेडियम स्कूल व ज्यू कॉलेज, धनकवडी, पुणे-४३. ऐवजी चाटे पब्लिक स्कूल अॅन्ड ज्यू.कॉलेज, धनकवडी पुणे